# पोलीस आयुक्तालय, अमरावती शहर

**दिनांक ०३/०१/२०२३- दैनिक गुन्हे**

**भाग १ ते ५**

**१) पो.स्टे. फ्रेजरपुरा -** हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फि सर तर्फे ज्ञानेश्वर श्रीराम डेहनकर वय ४५ तहसील कार्यालय भातकुली महसुल सहायक रा पार्वती नगर नं २ अम यांनी रि दिला की दि ३१/१२/२२ चे १८/०० वा ते दि ०२/०१/२३ चे ०९/०० वा दरम्यान नमुद घ ता वेळी व ठिकाणी जुने तहसील कार्यालय भातकुली कॅम्प रोड अमरावती परीसरातुन निवडणुक संबधीत असलेली लोकसभा व विघानसभा मध्ये वापरण्यात आलेले पी आर ओ पुस्तके वर्ष २०१९ जुनी निकामी झालेलले कि अं ०४ ते ०५ हजार रूपये असलेली कोणीतरी अज्ञात चोराने तहसील कार्यालय भातकुली परीसरातुन उघडया जागेवरून चोरून नेली अशा फि चे लेखी रिपोर्ट वरून दि ०३/०१/२३ चे १४/१५ वा सदरचा गुन्हा दाखल.

**गुन्हा घडल्याचे ठिकाण:** जुने तहसील कार्यालय भातकुली कॅम्प रोड अमरावती

२) **पो.स्टे. गाडगेनगर -** हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी विंद्र पंढरीनाथ जरुदे वय ४४ वर्षे व्यवसाय जिम ट्रेनर रा. रवी नगर हनुमान मंदीर जवळ अमरावतीने घरगुती संबंध असणारे सुधीर थोरात यांना सन २०१६ मध्ये काही रक्कम उसनवार दिली होती. पण बराच काळ होवूनही त्याने रक्कम परत केली नाही. तेव्हा यातील आरोपी इसमाने तो स्वता पंचवटी चौकातील लवाद न्यायाधीकरण कार्यालया चा प्रमुख असून लवाद न्यायालय येथे गेले व आरोपीची भेट घेतली तेव्हा आरोपीने फीर्यादी ला विश्वासात घेवून सदर केससाठी सुरवातीला २०,०००/- रु व केसचा निकाल लागल्यावर ५००००/- रु दयावे लागेल असे बोलून फीर्यादीकडून ३०,६००/- रु घेतले बरेच दिवस होवूनही फीर्यादीला न्याय न मिळाल्याने त्याने आरोपीतांस त्याचे कार्यालयात जावून केस मागे घेण्याकरीता दिलेला दस्तऐवज व रक्कम परत मिळणेबाबत अर्ज केला असता दोन - तिन महीने फीरवीले व दि ०७.०४.२१ रोजी आरोपीने फीर्यादीला त्याचे कार्यालयात बोलावून केस मागे घेण्यासाठी ५०,०००/- रु ची मागणी केली व न दिल्यास गुन्हा दाखल करण्याची धमकी दिली. त्यावरुन फीर्यादीने आरोपीकडे लवाद न्यायाधिकरण चालविण्याची कोणतीही शासकीय परवानगी नसतांना स्वताचे आर्थीक फायदयासाठी लवाद अधिकारी असल्याचे भासवून खोटे लबाडीने बोलून खोटे दस्तऐवज तयार केले व फीर्यादीला पैशाची मागणी करुन लवकरात लवकर केसचा निकाल लावून देतो असे बोलून दि.०४/०५/२०२० ते १७.०२.२०२२ वा दरम्यान ३०,६००/- रु. घेतल्याने फीर्यादीचे लेखी अर्जावरुन व बयाणवरुन चौकशीअंती मा.पोउपआ.सा. परीमंडळ क्र १ अमरावती शहर यांचे तोंडी परवानगीने सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला.अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन सध्दार्थ रामटेके यांचे विरुध्द दि.०३/०१/२३ चे ००/४५ वा. सदरचा गुन्हा दाखल.

**गुन्हा घडल्याचे ठिकाण:** पंचवटी चौक अमरावती

**३) पो.स्टे. गाडगेनगर -** हकीकत अशा प्रकारे आहे की यातील फिर्यादी सुरेश भिमराव रोघे वय ७० वर्ष रा. छत्रसाल नगर पाठ्यपुस्तक जवळ अमरावती व आरोपी संदीप सुरेश रोंघे वय ४२ वर्ष रा. छत्रसाल नगर पाठयपुस्तकालय जवळ अमरावती हे वडील व मुलगा असून फीर्यादीचा मुलगा हा दारु पिण्याच्या सवयीचा असून दि ०२-०१-२०२२ चे १८.००वा नमुद घतावेळी ठीकाणी आरोपी हा दारु पिवून घरी आला व विनाकारण शिवीगाळ फीर्यादीस करत होता फीर्यादीने शिवीगाळ चे कारण विचारले असता अश्लील शिवीगाळ करुन लाथा बुक्यांनी मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. फीर्यादीचे पत्नीने दोघांचे भांडण सोडविण्याकरीता मध्ये आली असता तिला सुध्दा धक्का माारला व फीर्यादीचे सुनेवरसुध्दा चारीत्रावर संशय घेवून तिला मारझोड करतो. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन दि ०३-०१-२०२३ वा चे ०१-३० वा सदरचा गुन्हा दाखल.

**गुन्हा घडल्याचे ठिकाण:** छत्रसाल नगर पाठयपुस्तक जवळ, अमरावती

४) **पो.स्टे. वलगांव** -हकिकत आशा प्रकारे आहे कि यातील फिर्यादी शेख वसीम शेख मेहबुब वय ४० वर्ष रा. सुफि नगर वलगांव यांचे नावावर चार चाकी आहे. ती चार चाकी फिर्यादीने सतिनगर आरामसीन जवळ उभी केली होती दि.०२/०१/२०२३ ते ०७/०० वा ते दि. ०३/०१/२०२३ चे चे ०७/०० वा. पावेतो नमुद घटना ता.वेळी व ठीकानी यातील फिर्यादी यांची १)चार चाकी गाडी ६०८ क्रमांक एम एच ३५-१०८२ याची लीव्हो प्रो. कंपणीची बॅंटरी कि. ६०००/-रु, २) गाडी क्र.एम एच -२७-ए-४४४७ टाटा ४०७ गाडी जे के कंपणीची बॅंटरी कि. ५०००/-रु ही जुनी वापरती असा एकुण ११,०००/-रु चा माल कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली अशा फिर्यादीच्या अशा फि.चे जबानी रिपोर्ट वरुन व डी.ओ.आदेशाने दि.०३/०१/२०२३ १३/०८ वा.सदर चा गुन्हा दाखल.

**गुन्हा घडल्याचे ठिकाण:** सतीनगर वलगांव

**५) पो.स्टे. राजापेठ:** हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील नमुद घटना ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी अविनाश पांडुरंगजी अंबाडकर वय ५९ वर्ष व्यवसाय सेवानिवृत्त रा. जाधव विहार आकोली रेल्वे स्टेशन रोड दुर्गा जवळ अमरावती हे दि.०२/०१/२०२३ चे सकाळी ०९-०० वा. शेगाव जावुन रात्री २०-३० वा. परत घरी येवुन सकाळी ०३/०१/२०२३ चे सकाळी ०७-३० वा. दुध घरातील दुकानात ठेवण्याकरीता गेले असता दुकानाचे सामान अस्तव्यस्त दिसले. दुकानाचे मागचे दाराचे कुलुप तुटलेले दिसले. तसेच पैसे ठेवण्याची पेटी सुध्दा फुटलेली दिसली व चिल्लर व नगदी पैसे एकुण १५,००० रू. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने दिवसा दरम्यान चोरी केल्याचे लक्षात आले. .अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून दि.०३/०१/२०२३ चे १०-०८ वा सदरचा गूऩ्हा दाखल करून तपासात घेतला.

**गुन्हा घडल्याचे ठिकाण:** फि.च्या राहते घरी जाधव विहार अमरावती

**६) पो.स्टे. राजापेठ:** हकिकत अशा प्रकारे आहे कि, यातील फिर्यादी सुधीर मधुकरराव शिंदे वय ५० वर्ष व्यवसाय व्यापार रा. बालाजी प्लॉट सिताराम बाबा मंदिर मागे अमरावती चा मुलगा हा दि.३१/१२/२०२२ चे १८-३० वा. दरम्यान नमुद घटना ता वेळी व ठिकाणी त्याचे मित्राकडे खेळण्यास गेला असता शारदा नगर बगीच्या गेट जवळ HERO MILAND GE M २७ ST DDB CYCLE FR.NO- HVC६५१४६ सिल्व्हर रंगाची कि.अं. ८४५० रू ची उभी करून ठेवलेली होती. ती कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली. अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरून दि.०३/०१/२०२३ चे ११-४४ वा.
सदरचा गून्हा दाखल.

**गुन्हा घडल्याचे ठिकाण:** शारदा नगर, बगीच्या जवळ, अमरावती

**७) पो.स्टे. खोलापूरी गेट:** हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घटना ता. वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी अजिंक्य पद्माकर आष्टीकर वय २६ वर्ष रा. भाजी बाजार अमरावती हे ३१/१२/२०२२ चे १७.१५ वा दरम्यान आपली टु व्हीलर गाडी FZ यामाहा क्र. MH-27-BK-6958 ने जात असतांना त्याचे मोटर सायकलचे समोर मालवाहु ऑटो क्रं. MH-27-P-2448 हा जात होता त्याचे चालकाने कोणताही इशारा न देता उजव्या बाजुने ऑटो वळविला त्यामुळे ऑटोचे साईड अँगल फिर्यादीचे मोटरसायकल चे हॅंडलला अडकले त्यामुळे फिर्यादीची मोटर सायकल घासत जावुन रोडवर पडले त्यामुळे फिर्यादीली डाव्या हाताचे दंडावर व खांद्यावर मार लागुन जखम झाली यातील मालवाहु ऑटो चालकाने फिर्यादीचे मोटर सायकल ला ठोस मारुन जखमी करुन मोटर सायकलचे नुकसान करुन पळुन गेला अशा फिर्यादीचे जबाणी रिपोर्ट वरुन०३/०१/२०२३ चे १६.१८वाजता एन. सी. ची समज दिली.
**गुन्हा घडल्याचे ठिकाण:** बिंड ज्वेलर्स दुकाना जवळ बुधवारा अमरावती

## भाग १ ते ६

१) **पो.स्टे. वलगांव:** हकिकत आशा प्रकारे आहे कि नमुद घटना ता.वेळी व ठीकानी यातील फिर्यादी निखील सुभाषराव टकोरे वय ३१ वर्ष रा. गणेश नगर शेगाव राहाटगांव रोड अमरावती हे दि.०२/०१/२०२३ ते २२/०० वा त्यांचे मित्रासह त्यांची चार चाकी पाढ-या रंगाची हुदाई ऑरा गाडी क्र.एम एच २७ डीए -५५५४ ने अकोला येथुन अमरावती ला येत असतांना पेढी नदीच्या पुलावर वलगांव मागुन याणा-या वाहन अशोक लिलैन्ड दोस्त + मिनी ट्रक एम. एच२७-बी एक्स -६६१२ चा चालकाने त्यांचे ताब्यातील चार चाकी वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या गाडीचे मागुन चोरदार ठोस मारली त्या मध्ये फिर्यादीच्या चार चाकी हुदाई ऑरा गाडी क्र.एम एच २७ डीए -५५५४ चे मागील बाजुस धडक मारुन नुकसान केले सदर अपघातात कोनीही जखमी नाही व तेथुन सदर ट्रक क्र. .एम.एच २७-बी एक्स -६६१२ चा चालक याने पोलीसांना कुढलीही माहीती व देता पळुन गेला अशा फिर्यादीच्या जबानी रिपोर्ट वरुन दि.०३/०१/२०२३ वा चे १५/३३ वा.सदरचा गुन्हा दाखल.
**गुन्हा घडल्याचे ठिकाण:** पेढी नदीचे पुलावर, वलगांव